महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महापारेषण समाचार

वर्ष-११ अंक-२
फेब्रुवारी - मार्च २०१७



**राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

प्रिय कर्मचारी बंधु आणि भगिनींनो,

नवीन वित्तीय वर्ष २०१७-२०१८ मध्ये आपण पदार्पण करत आहोत. त्या नवीन वर्षामध्ये सुध्दा आपण सर्वांकडुन चांगली कामगिरी व सहकार्य मिळेल, याची मला आशा आहे. वर्ष २०१६-२०१७ मध्ये आपण अनेक विभागांमध्ये सुसुत्रता आणण्याकरीता प्रयत्न केले व अनेक लहान-मोठया सुधारणा अंगीकृत करुन विभागाच्या कार्यपध्दतीचा वेग व कार्यकुशलता वाढविण्याचा प्रयत्न केला. मला आशा आहे की, आता हा प्रवाह असाच पुढे सुरु राहीला पाहिजे. जेणेकरुन सततच्या सुधारणेमुळे परिपूर्णता होऊन कामे अधिक जलद गतीने होण्यास मदत होईल.

विजक्षेत्राचा देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ते मोलाचा वाटा आहे. विजेची उपलब्धी सर्वांना व्हावी त्याकरीता अनेक स्तरांवर नियोजन करण्यात येते. महाराष्ट्र राज्य विजक्षेत्रात त्याच्या तिनही विभागात निर्मिती, पारेषण व वितरण यामध्ये चांगली कामगिरी बजावत आहे. असे होत असताना आपल्याला विजेच्या वाढत्या दरावर सुध्दा लक्ष देणे गरजेचे आहे. जेणेकरुन महाराष्ट्राचे वीज दर इतर राज्याच्या तुलनेने कमी असेल त्याची गुणवत्ता व उपलब्धता अबाधीत राखुन असे करुन दाखवणे महाराष्ट्र राज्याकरीता एक महत्वाचा भाग व आवाहन आहे.

त्याकरीता प्रत्येक विभागाने ह्या ध्येयाने प्रेरीत होऊन कार्य करणे महत्वाचे ठरते. अवाजवी खर्च कुठे टाळता येईल व असलेल्या कामाचे उत्कृष्ट नियोजन करुन कमी खर्चात कुशल कामे कसे करुन घेता येईल हे प्रत्येक विभाग प्रमुखाने आपल्या कार्याचा एक घटक म्हणून पाहणे गरजेचे आहे.

वर्ष २०१६-२०१७ मध्ये वाहिनी, उपकेंद्र यांच्या संचलन व सुव्यवस्था तसेच प्रकल्पामध्ये अपेक्षित कामगिरी पार पाडण्यात आपल्याला यश मिळाले. तसेच STU, SLDC, CPA ह्या विभागांनी सुध्दा आपल्याला ठरवुन दिलेल्या नियोजनानुसार कामे पार पाडला. F&A, HR विभाग जे व्यवस्थापनास त्यांची क्रमशक्ती वाढविण्याचे कार्य करतात त्यांनी सुध्दा आपले उद्दिष्ट प्राप्त करण्याकरीता पर्याप्त कामगिरी बजावली. आता अधिक जोमाले Plam, Do, Check, Act ह्या मंत्रानुसार आढावा घेत आपल्या पुढील कामगिरी करणे गरजेचे आहे. सर्वांच्या एकूण चांगल्या कामगिरी वर आपल्या कंपनीची प्रगती विसंबुन आहे. त्याकरीता आपण जाणिवपूर्वक प्रयत्न कराल याची मला खात्री आहे. कोणा व्यक्तीकरीता जबाबदारी बजाऊ नका तर कंपनी करीता कार्य करीत राहा. कंपनीचे Vision – Mission - Objectives अंगीकृत करा. त्यातुन आपल्या गुणांचा विकास करण्याची अनेक संधी आपल्याला प्राप्त होतील. कार्यामध्ये संपूर्ण मग्न होऊन कार्य केले असता त्याचा लाभ कंपनीस जेवढा होता त्याहीपेक्षा जास्त स्वत:च्या कार्यगुणांना विकास करण्याकरीता होता.

वरिष्ठ अधिकारी आपल्या ज्ञानाचा वारसा आपल्या कनिष्ठ अधिकाऱ्यास त्यांच्या सततच्या संवादातून देत राहतो, तो आपल्यामध्ये आत्मसात करणे गरजेचे राहते. Devotion, Commitment, Work Discipline, Hardworking, Sincerity, Contribution ह्या बाबी त्यातुन विकसित होत राहतात. महापारेषण देशातील एक अग्रेसर कंपनी म्हणून नावलौकीक मिळवत आहे व हा गौरव पुढे सुध्दा कायम राखने आपल्या सर्वाची जबाबदारी आहे. त्याकरीता पुन्हा नवीन वर्षाकरीता अधिक जोमाने कटीबध्द होऊया. प्रत्येक विभागामध्ये नवीन वर्षाकरीता Performance/Target करणे गरजेचे ठरतेव त्या ठरवुन दिलेल्या Targets नुसार कामगिरी बजावणे अपेक्षीत आहे. प्रत्येक वेतन गट १ व २ मधील अधिकारी आपल्या Target बरोबर Align होतो तेव्हा कंपनी संपूर्णपणे आपल्या परिणामांकरीता समरुप होऊन जाते. हे Performance/ Target Planning ची पायरी पुढील दोन महिने म्हणजे एप्रिल/मे मध्ये संपणे गरजेचे ठरते. त्यास विलंब होता कामा नये. संचलन व सुव्यवस्था व प्रकल्प आपल्या यंत्रणेचे दोन अतिशय महत्वाचे घटक आहेत. मला आशा आहे नवीन वर्षाकरीता ह्या दोन विभांगामध्ये अधिक भरीव कामगिरी वर्ष २०१७-२०१८ मध्ये पार पडेल.

स्पर्धात्मक युगात आपल्याला कुणाला हरवायचे नाही तर जिंकायचे आहे. आपली स्पर्धा आपल्या स्वत:शी आहे. प्रगतीच्या दिशेने आपण वाटचाल करत आहोत. आपण सर्व पुन्हा एकदा मोठ्या उत्साहात नवीन वर्षात कामगिरी पार पाडाल अशी मी आशा बाळगतो.

शुभेच्छां सह !

**राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

## From the Desk of Director (Operations )

Operations and Maintenance of Sub-Station and Lines are very important and vital aspects of Transmission System. If timely and proper maintenance is not carried out it directly affects system availability and reliability. As per the directives, the transmission system is required to be made available all the time. There should not be interruption in supply to our stake holders. Our network is spread all over Maharashtra State and are operated and maintained by our employees. Our Technicians/ Operators/ Engineers and Officers are placed all over Maharashtra State and they are equipped with knowledge and equipment to operate and maintain this transmission system.

MSETCL owns and operates and maintains most of Maharashtra's Transmission network. Our transmission network comprises of 44141 CKT lines and 642 EHV S/s with 116920 MVA transformation capacity. Today MSETCL is the largest state transmission utility in the country. The spread and reach of our network is huge and therefore it requires proper system, procedure and practices to be in place in order to well operate and maintain the transmission system. There are various types of equipment used in transmission system which are to be properly managed and maintained. The equipment are required to be periodically maintained and tested to ensure its proper functioning. Regular maintenance, breakdown maintenance and predictive maintenance and patrolling schedule is required to be followed scrupulously. Any lethargy or complacency shall put entire system vulnerable. Therefore the work schedule is required to be followed as per specified time limit.

Over the period of time, technology has come to our advantage, however those are also required to be maintained properly. Hot Line Maintenance to be performed with proper safety precaution and safety guidelines to be followed at work place all the time. The automation work in the Operations and Maintenance system is in progress. Once they are fully in place, the system reliability shall further be strengthened.

It is also important to attend breakdown at minimal time and cost. The resources are required to put in to place in such a way so as to restore the system normalcy at the shortest time. The reasoning for every interruption to be analyzed and due precaution to be taken from the lesson learnt. Life Extension and Augmentation scheme to be put in place as per proper planning. The aspects of reactive power management has become very crucial now-a-days and in particular during ruby and summer season. To deal with the problems of low voltage and excessive MVR drawl, the schemes for installation of capacitor banks need to be implemented on top priority basis. Timely and periodic review and monitoring to be carried out in order to decide priority areas and critical path.

MSETCL operates and maintains its transmission system above the norms specified by our regulators. Continuous efforts are being taken to improve system availability and reliability. With continued efforts and hard work, we determine

**O K Yempal**
**Director (Operations)**

## "आरोग्य हृदय संपदा"

अ.उ.दा.प्रकल्प नि संवसु परिमंडल, नाशिक येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये दिनांक १४-०२-२०१७ रोजी माधव बाग नाशिक यांच्या वतिने **"आरोग्य हृदय संपदा"** या विषयावर डॉ. साठे यांचे सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले त्यावेळी मोठ्या संख्येने अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. डॉ. आनंदी साठे यांनी हृदय विकार, मधुमेह, रक्तदाब, लठ्ठपणा या सारखे आजार कसे टाळता येतील तसेच सात्विक व आरोग्य पूर्ण जीवन कसे जगता येईल या बाबत सविस्तर माहिती माधव बाग यांच्या वतीने देण्यात आली. अशा प्रकारे माधव बाग यांच्यावतीने डॉ. आनंदी साठे यांनी **"आरोग्य हृदय संपदा"** या विषयावरील व्याख्यानास मोठ्या प्रमाणात अधिकारी कर्मचारीवर्ग उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक राजेंद्र ताडगे, उप व्यवस्थापक (मासं) यांनी केले. यावेळी मोठ्या प्रमाणात कर्मचारी यांनी व्याख्यानाचा लाभ घेतला व कार्येक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

# महापारेषण कंपनीच्या ६ व्या आतंर परिमंडळीय राज्यस्तरीय नाट्य स्पर्धा

महापारेषण कंपनीच्या ६ व्या आतंर परिमंडळीय राज्यस्तरीय नाट्य स्पर्धा १९ फेब्रुवारी-२०१७ रोजी मुख्य अभियंता, अ.उ.दा. प्रकल्प नि. संवसु परिमंडळ, नागपूर कार्यालयाच्या यजमान पदाखाली डॉ. वसंतराव देशपांडे सभागृह सिव्हील लाईन्स, नागपूर येथे संपन्न झाली.

सदर नाट्य स्पर्धेचा उद्घाटन सोहळा दि. १९.०२.२०१७ रोजी श्री. ओमप्रकाश एम्पाल, संचालक (संचलन), सांघिक कार्यालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली तसेच उद्घाटक डॉ.रंजन दारव्हेकर, जेष्ठ रंगकर्मी, लेखक व दिग्दर्शक, तसेच श्री. अनंत पाटील, (मुख्य समन्वयक) तथा मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांचे उपस्थिती मध्ये पार पाडला. सदर कार्यक्रमास महापारेषण कंपनीचे मुख्य अभियंता



श्री. वाय. जी, गजभिये, कराड श्री. एस. जे. पाटील, अमरावती व श्री. बी. टी. राऊत, नाशिक व इतर अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. मिलिंद बहादुरे, मुख्य अभियंता, नागपूर परिमंडळ यांनी केले तसेच चार दिवस चालणाऱ्या नाट्यस्पर्धेचा सर्वांनी आनंद घ्यावा व स्पर्धा सुरळीत पार पाडण्याचे त्यांनी आव्हान केले.

सदर उद्घाटनीय कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ. आरती पगारे, व्यवस्थापक (विवले) यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. अभय रोही, सहा, महाव्यवस्थापक (मासं) यांनी केले.

चार दिवस चाललेल्या नाट्यस्पर्धे दरम्यान महापारेषण कंपनीचे परिमंडळ कार्यालये, नागपूर द्वारा "तो परत आलाय", नाशिक परिमंडळ द्वारा "आधारशिला", कराड परिमंडळ द्वारा "टेक इट लाईटली", अमरावती परिमंडळ द्वारा "तुझ्या माझ्यात" वाशी परिमंडळ द्वारा "सुईधागा", पुणे परिमंडळ द्वारा "कुणी तरी आहे तिथं", व औरंगाबाद परिमंडळ द्वारा "खेळिया", नाटकांचे प्रस्तुतीकरण केले संबंधित परिमंडळातंर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांनी आपल्या अभिनयाच्या बळावर नाटकांचे उत्कृष्ट सादरीकरण करुन नाट्य रसिकांवर भुरळ पाडली.

नाट्य स्पर्धेच्या परिक्षकांची भुमिका सौ. माधुरी बेडेकर, डॉ. विनोद इंदुरकर व श्री. संजय काशीकर यांनी निष्पक्षपणे पार पाडली. सदर स्पर्धे मध्ये वाशी परिमंडळाद्वारे सादर केलेल्या 'सुईधागा" या नाटकास प्रथम पारितोषिक व नाशिक परिमंडळाद्वारे सादर केलेल्या 'आधारशिला" या नाटकाने द्वितीय पारितोषिक पटकाविले. सर्वोत्तम अभिनयाचे पारितोषिक पुरुष भुमीकेसाठी श्री. शामसुंदर सावंत यांना 'सुईधागा" या नाटकातील भूमीकेसाठी व स्त्री भूमीकेसाठी सौ. पल्लवी देशपांडे यांना 'सुईधागा" या नाटकातील भूमीकेसाठी मिळाली.

महापारेषण कंपनीच्या ६ व्या आंतर परिमंडळीय (राज्यस्तरीय) नाट्यस्पर्धा २०१६-२०१७ यशस्वीरित्या संपन्न झाल्या. सदर स्पर्धेचा समारोप व बक्षीस वितरण कार्यक्रम श्री. रविंद्र चव्हाण, संचालक (प्रकल्प), महापारेषण, मुंबई यांच्या शुभहस्ते श्री. प्रसाद रेशमे, प्रादेशिक संचालक, महावितरण, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. अजित दिवाडकर, जेष्ठ रंगकर्मी, नागपूर यांचे प्रमुख उपस्थितीत पार पाडला. सदर कार्यक्रमास श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (मासं) व श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मासं) महापारेषण, मुंबई तसेच मुख्य अभियंते श्री. संजय शिंदे, वाशी परिमंडळ, श्री. गणपत मुंडे, औरंगाबाद परिमंडळ व श्री. एस. जे. पाटील, अमरावती परिमंडळ हे प्रामुख्याने उपस्थित होते. श्री. अनंत पाटील, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी तथा नाट्य स्पर्धेचे मुख्य समन्वयक अधिकारी यांचे नागपूर परिमंडळाने विशेष आभार व्यक्त केले.

सदर नाट्यस्पर्धा यशस्वी पार पाडण्याकरीता श्री. मिलिंद बहादुरे, मुख्य अभियंता, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक्षक अभियंता श्री. सतिश अणे, श्री. अविनाश निंबाळकर, श्री. अद्वैत देव, श्री. मनोहर भगत, श्री. अविनाश कोंडावार, तसेच कार्यकारी अभियंता श्री. राहुल दहीकर, श्री. एम. एस. तट्टे, श्री. जे. एम. कोकाटे, सौ. सावरकर त्याच प्रमाणे सहा. महाव्यवस्थापक (मासं) श्री. अभय रोही व सहा. महाव्यवस्थापक (विवले) श्री. पीयुष चिक्षे व नागपूर परिमंडळातील इतर कर्मचारी/अधिकारी यांनी अथक परिश्रम करुन स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडली, त्याबद्दल श्री. रविंद्र चव्हाण, संचालक (प्रकल्प), सांघिक कार्यालय, महापारेषण मुंबई यांनी श्री. मिलिंद बहादुरे, मुख्य अभियंता, नागपूर परिमंडळ व चमुचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाची सांगता श्री. भरत पाटील, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महापारेषण, मुंबई यांनी आभार प्रदर्शनाने केले.

## मद्यधुंद अवस्थेत अतिउच्च दाब वाहिनीवर चढलेल्या तरूणाला सुखरुपपणे खाली उतरविण्यात वाहिनी देखभाल उपविभाग बारामती येथील अधिकारी/कर्मचाऱ्यांना यश

दि. २३.०२.२०१७ रोजी अ.उ.दा. प्रकल्प नि संवसु परिमंडल, पुणे व अ.उ.दा संवसु मंडल, सोलापूर अंतर्गत अ.उ.दा. संवसु विभाग बारामती येथील २२० के.व्ही. उपकेंद्र कल्याणी नजीक श्री. रघुनाथ रामभाऊ शिंदे, (वय ४५, रा. दादा पाटील नगर, बारामती) हे मद्यधुंद अवस्थेत २२० के.व्ही जेजुरी-बारामती, लोणंद-बारामती, कल्याणी-बारामती, कुरकुंभ-बारामती या बहुधारा (Multicircuit) वाहिनीवर चढले होते. हे समजल्यावर बारामती नगरपरिषद अग्निशामक यंत्रणा, पोलिस आणि



खालील नमुद महापारेषणचे कर्मचारी त्याठिकाणी त्वरीत पोहचले व सदर व्यक्तीस २-३ तास खाली उतरण्यास आवाहान करण्यात येत होते. तसेच सदर वाहिनीवरील वीज प्रवाह खंडित केला असता तर दौंड, इंदापूर व बारामती या तीन तालुक्यांचा वीजपुरवठा खंडित झाला असता. परंतु वीजपुरवठा खंडित न करता सुरक्षेबाबतची योग्य ती दक्षता घेऊन शर्थीच्या अथक प्रयत्नानंतर सदर व्यक्तीस दोर व सेफ्टी ब्लेटच्या सहाय्याने श्री. प्रमोद मारुती भोसले, कार्यकारी अभियंता यांच्या मार्गदर्शनानुसार काली उतरविण्यात वाहिनी देखभाल उपविभाग बारामती येथील खालील अधिकारी/कर्मचाऱ्यांना यश आले.

१. श्री. ए. जी. धर्माधिकारी, अतिरिक्त कार्यकारी अभियंता
२. श्री. ए. के. जाधव, मुख्य कार्यदेशक
३. श्री. एन. व्ही. खोमणे, मुख्य कार्यदेशक
४. श्री. एन. टी. नाळे, तंत्रज्ञ श्रेणी – ४
५. श्री. के. डब्ल्यु. जाधव, तंत्रज्ञ श्रेणी – ४
६. श्री. व्ही. एस. वाबळे, तंत्रज्ञ श्रेणी – ४
७. श्री. एन. एस. पवार, तंत्रज्ञ श्रेणी – ४
८. श्री. एन. बी. खिंडारे, तंत्रज्ञ श्रेणी – ४
९. श्री. एस. व्ही. डोंगरे, तंत्रज्ञ श्रेणी – ४
१०. श्री. एस. डी. पवार, तंत्रज्ञ श्रेणी – ४
११. श्री. एम. एस. सपकाळ, तंत्रज्ञ श्रेणी – ४
१२. श्री. आर. एम. गायकवाड,तंत्रज्ञ श्रेणी – ४

या कामगिरीबद्दल दै.लोकमत, बारामती येथील पोलीस विभाग, श्री. अरुण कृ. वाघमारे, अधिक्षक अभियंता, अ.उ.दा. संवसु मंडल सोलापूर व श्री. रोहिदास नि. मस्के, मुख्य अभियंता, अ.उ.दा.प्रकल्प नि संवसु परिमंडल, पुणे यांनी उपरोक्त अधिकारी/कर्मचारी यांचे विशेष कौतुक केले.

## प्रधान सचिव, ऊर्जा,मा. श्री. अरविंद सिंह, IAS यांचे महापारेषण कंपनीतर्फे स्वागत

दि.१४.०२.२०१७ रोजी महापारेषण कंपनी तर्फे कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, श्री. राजीव कुमार मित्तल, IAS यांनी प्रधान सचिव, ऊर्जा ह्या पदावर रुजु झालेले श्री. अरविंद सिंह, IAS यांचे स्वागत केले.



ह्या प्रसंगी महापारेषण कंपनीचे इतर संचालक मंडळ, संचालक (संचनल), संचालक (प्रकल्प), संचालक (वित्त), कंपनी सचिव व इतर वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

श्री. अरविंद सिंह साहेबांना त्यांच्या पुढील वाटचाली करीता मनपूर्वक शुभेच्छा

## कनिष्ठ लिपीक (लेखा) यांस करिता "इंडक्शन लेव्हल" प्रशिक्षणाचे आयोजन

अति उच्च दाब प्रकल्प नि संवसु परिमंडळ, नाशिक परिमंडळ कार्यालयामार्फत दिनांक ०९/०२/२०१७ रोजी कनिष्ठ लिपीक (लेखा) या पदावर सरळसेवा भरतीव्दारे नाशिक परिमंडळात रुजू झालेले कनिष्ठ लिपीक (लेखा) यांचे **"इंडक्शन लेव्हल"** प्रशिक्षण दिनांक ०९/०२/२०१७ रोजी या परिमंडळाच्या मुख्य इमारतीत घेण्यात आले. नवनियुक्त कर्मचाऱ्यांना महापारेषण कंपनीची कार्यपध्दती, रचना, तसेच नवनियुक्त कर्मचाऱ्यांना कर्मचाऱ्यांना कर्मचारी सेवाविनियम बाबत ज्ञान करणे तसे या कंपनीची वापरात असलेली लेखा व वित्त कक्षा संबंधित इआरपी प्रणाली यांची ज्ञान होणे या उद्देशाने नाशिक परिमंडळामार्फत या नवनियुक्त निम्नस्तर लिपीक (लेखा) यांचे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.



या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. भरत गवळी, उप-कार्यकारी अभियंता (अतिरिक्त पदभार) अतिरिक्त कार्यकारी अभियंता (प्रशिक्षण), प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, बाभळेश्वर यांनी या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व प्रास्ताविक केले.

या परिमंडळाचे प्रमुख श्री. भाऊराव राऊत, मुख्य अभियंता व वित्त व लेखा कक्षाचे प्रमुख श्री. विजय नलावडे, सहाय्यक महाव्यवस्थापक यांचे या परिमंडळाचे मानव संसाधन कक्षाचे प्रमुख श्री. राहुल सुतार, सहाय्यक महाव्यवस्थापक यांचे हस्ते स्वागत करण्यात आले.

या परिमंडळाचे वित्त व लेखा कक्षाचे प्रमुख श्री. विजय नलावडे यांनी या नव नियुक्त कर्मचाऱ्यांना त्यांची लेखा व वित्त कक्षातील कामे व कर्तव्याची जाण करुन दिली.

## जागतिक महिला दिन, ८ मार्च २०१७ महापारेषण कंपनीत साजरा
## नाशिक परिमंडळ

अति उच्च दाब प्रकल्प नि संवसु परिमंडळ नाशिक येथील कॉन्फरन्स हॉल मध्ये दिनांक ०८.०३.२०१७ रोजी जागतिक महिला दिन मा.मुख्य अभियंता, श्री. राउत साहेब यांच्या अध्यक्षतेखाली अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

सर्व प्रथम मा. मुख्य अभियंता, श्री. राउत साहेबांनी महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन केले व तसेच सर्वश्री श्री. पी. एस. साळे, अधिकक्षक अभियंता, श्री. आर. पी. सुतार, सहा.महाव्यवस्थापक (मासं) व तसेच श्री. व्हि. एम. ढोरे, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांनी प्रतिमांन पुष्प अर्पण केले व सर्व अधिकाऱ्यांनी त्यांचे महिलांविषयीचे मनोगत व्यक्त करुन उपस्थित सर्व महिला कर्मचारी/अधिकारी व प्रमुख अतिथिंचा पुष्प देवून सत्कार केला.



सकाळच्या सत्रातील प्रमुख वक्त्या सौ. शोभा पवार, अध्यक्षा, बाललैंगिक विरोधी मंच, नाशिक यांनी महिला व बालकांवर होणारे सामाजिक व लैंगिक अत्याचार व त्यानुषंगाने प्रतिबंधात्मक उपाय या अत्यंत महत्वाच्या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

## वाशी परिमंडळ

दिनांक ०८ मार्च २०१७ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधुन वाशी परिमंडळ व राज्य भार प्रेषण केंद्र, कळवा येथील कर्मचाऱ्यांकरिता पडघा मंडल येथे "महिला सक्षमीकरण" या प्रशिक्षणाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या प्रसंगी वाशी परिमंडळांचे मुख्य अभियंता, श्री. संजय शिंदे याच्या मार्गदर्शनाखाली पडघा मंडलाचे अभियंता, श्री. महेंद्र वाळके यांनी सदर प्रशिक्षणाचे आयोजन केले.

या प्रशिक्षणाकरिता विशेष वक्त्या म्हणून कापुरबावडी पोलीस स्टेशन समुपदेशन केंद्र व्यवस्थापक श्रीमती सई लेले यांनी महिलांनी सबलीकरणासाठी कोणते मार्ग अवलंबवावेत या विषयी मार्गदर्शन केले, द्वितीय प्रमुख वक्त्या म्हणून ठाणे पोलीस महिला महिला सुरक्षा कक्ष येथील समुपदेशक व "विशाखा समिती" च्या सदस्या श्रीमती स्मिता प्रधान यांनी कामाच्या ठिकाणी होणाऱ्या "लैंगिक अत्याचार", विषयक कायद्यांची सर्व प्रशिक्षणार्थीना माहिती करुन दिली.

पूढे सुरू....

## अमरावती परिमंडळ



अमरावती परिमंडळ कार्यालयात दिनांक :०८/०३/२०१७ रोजी **'जागतिक महिला दिन"** श्री. सु. ज. पाटील, मुख्य अभियंता यांचे अध्यक्षतेखाली उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी सौ. सुरेखा दि. लुंगारे, नवनिर्वाचीत नगर सेविका व अध्यक्षा, मेहेर बहुउद्देशीय संस्था, अमरावती ह्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थितीत होत्या. श्री. नितीन कृ. कांबळे, सहा. महाव्यवस्थापक (मासं), श्री सचिन सावरकर, (प्रभारी) सहा. महाव्यवस्थापक (विवले), सौ. प्रणोती देशमुख, श्री. सुनिल पुरकर, श्री. अरविंद डडमल, श्री. प्रविण देशमिख इत्यादी कार्यकारी अभियंते उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये परिमंडळालांतर्गत कार्यरत महिला अधिकारी/कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सौ. लुंगारे यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. तसेच सौ. प्रणोती देशमुख, कु. सविता सातव व या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सौ. सुरेखा दि.लंगारे, यांनी जागतिक महिला दिनानिमीत्त महिला सबळीकरणावर आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे संचलन सौ. स्नेहा अलाटे यांनी केले. उपस्थित सर्व महिला अधिकारी/कर्मचारी यांना भेट वस्तु देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमास अमरावती परिमंडळातील अधिकारी/ कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्काडा/ एस ए एस प्रणाली या विषयावर कार्यशाळा

मुख्य कार्यालय, मुंबई येथे स्काडा/ एस ए एस प्रणाली या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. फेब्रुवारी माहिन्यात झालेल्या या कार्याशाळामध्ये प्रणाली उत्पादकांच्या प्रतिनिधींनी भाग घेतला. या कार्याशाळांमध्ये महापारेषण कंपनीतर्फे मा. राजीवकुमार मित्तल, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, श्री. ओमप्रकाश एम्पाल, संचालक (संचलन), श्री. रविंद्र चव्हाण, संचालक (प्रकल्प), श्री. शंशाक जेवळीकर, मुख्य अभियंता, श्री. श्रीराम भोपळे, मुख्य अभियंता व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

दिनांक ०६.०२.२०१७ रोजी 'सिफंग ऑटोमेशन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' तर्फे सादरीकरण करण्यात आहे. यामध्ये सिफंग चे सर्वश्री. गिरिश हंसवाडकर, एच. व्ही. भार्गव व आर.एम. असोसिएटचे मुकुल ब्रम्हे यांनी भाग घेतला.

दिनांक १३.०२.२०१७ रोजी 'स्नायडर इलेक्ट्रिक' यांनी केलेल्या सादरीकरणात सर्व श्री. सचिन पाटील, शाम अय्यर, देवेंद्र पठारे व भास्कर साहु यांचा सहभाग होता.

दिनांक २०.०२.२०१७ रोजी आयोजित कार्यशाळेत 'एबीबी इंडिया लिमिटेडच्या' सर्व श्री. संजय खोत, विजय जोशी, योगेंद्र पटवर्धन, एम.व्ही. गिरिश व एस. आर.विजयन यांचा सहभाग होता.



'स्काडा/एस ए एस प्रणाली' या विषयावर एकूण पाच एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. त्यापैकी दोन कार्यशाळा माहे जानेवारीमध्ये व तीन कार्यशाळा माहे फेब्रुवारीमध्ये संपन्न झाल्या.

## मानव संसाधन विभागाकडून संकलीत केलेल्या प्रशासकीय परिपत्रके /परिपत्रके पुस्तिकांचे प्रकाशन

दि. १०.०३.२०१७ रोजी मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या हस्ते संचालक (वित्त), संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प) आणि कार्यकारी संचालक (मासं) यांच्या उपस्थितीत मानव संसाधन विभागातर्फे ०७ दक्षता विभागातर्फे ०१ तसेच औद्योगिक संबंध विभागातर्फे ०१ अशा एकुण ०९ संकलित केलेल्या प्रशासकीय परिपत्रके / परिपत्रके पुस्तिकांचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक (मासं), मुख्य अभियंता (संवसु) तथा मुख्य दक्षता अधिकारी, मुख्य सुरक्षा अधिकारी, महाव्यवस्थापक (मासं), मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी ,सांघिक तसेच क्षेत्रिय कार्यालयातील सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) उपस्थित होते. हया पुस्तिकांचे संच सांघिक तसेच क्षेत्रिय कार्यालयांना उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. हे संकलन या विषयाच्या संदर्भित अभ्यास करणा-यास उपयुक्त माध्यम ठरेल.



# MSETCL आणि NRSC ISRO यांचेद्वारे वेब आधारित Geographical Information System (GIS) Portal तयार करण्याकरिता सामंजस्य करार संपन्न




महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीची मालमत्ता महाराष्ट्र राज्यभर पसरलेली आहे. महापारेषण कंपनीने गाठलेल्या उत्तुंग यशाचे रहस्य म्हणजे त्वरित संवाद आणि माहितीची तत्पर उपलब्धता हे होय. महापारेषण कंपनीने व्यवसाय उत्कृष्ठता, तसेच कर्मचाऱ्यांची आणि कंपनीची कार्यप्रदर्शन सुधारण्याकरिता माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील ABT Metering, ERP आणि Automation संबधित विविध प्रणालीं इत्यादी पायाभुत सुविधा अंमलात आणल्या आहेत.

एक पाऊल पुढे म्हणून महापारेषण कंपनीद्वारे Indian Space & Research Organisation (ISRO) अंतर्गत National Remote Sensing Centre (NRSC) यांचेद्वारे वेब आधारित Geographical Information System (GIS) Portal तयार करण्याकरिता सामंजस्य करार करण्यात आलेला आहे.

सदरचा सामंजस्य करार दि. ०६ जानेवारी २०१७ रोजी Regional Remote Sensing Centre, Nagpur येथे करण्यात आला. या प्रसंगी महापारेषण कंपनीतर्फे श्री. संजय शिंदे, मुख्य अभियंता (ईआरपी-वाशी) व NRSC, ISRO तर्फे श्री. बी. गोपाल कृष्ण, उपसंचालक (DPPA & WAA) हे उपस्थित होते. या प्रकल्पात श्री. विशाल वाघचौरे, ERP PM Team Lead हे कार्यात्मक समन्वयक म्हणून तर श्री. अतुल वारजुरकर, IT Team Lead हे तांत्रिक समन्वयक म्हणून काम पाहणार असुन त्यांचेसमवेत सदरील सामंजस्य करार साईन करताना ईआरपी टीम मधील श्री. राहुल भट्ट आणि श्री. प्रशांत खटी हे देखील उपस्थित होते.

या प्रकल्पाबाबात अद्वितीय बाब आहे ती म्हणजे, हा प्रकल्प पुर्णत: NRSC आणि महापारेषण कंपनी या दोघांच्या सहयोगाने पूर्ण करण्यात येणार आहे. तसेच या प्रकल्पाबाबत कोणतेही शुल्क लागणार नसुन महापरेषण कंपनीची कोट्यवधी रुपयांची बचत होणार आहे. या प्रकल्पाचा पहिला टप्पा हा एप्रिल-२०१७ मध्ये पूर्ण करण्यात येणार असुन MSETCL GIS Portal वर महापारेषण कंपनीच्या उपकेंद्राबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. उपकेंद्राबाबतची माहिती विनिमय, तांत्रिक विश्लेषण सुविधा आणि अहवाल निर्मिती अशा अनेक अतिरिक्त सुविधा या पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आहेत.

अलीकडेच दि. २३ ते २५ जानेवारी-२०१७ या कालावधीमध्ये हैद्राबाद येथे झालेल्या जागतिक जियोस्पॅटीअल फोरम (World Geospatial Forum) या कार्यक्रमामध्ये अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थेद्वारे महापारेषण कंपनीच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करण्यात आले.

## Senior Officer's Retirement/Appointment in the Month of February - March 2017

### Appointment

| Sr. No. | Name of Officer's | Design. | Place of working | Date |
|---|---|---|---|---|
| | Nil | - | - | - |

### Retirement

| Sr. No. | Name of Officer's | Design. | Place of working | Date |
|---|---|---|---|---|
| 1. | Shri. Sonkawade Laxmidas Shankarrao | CE (Trans.) | Trans. (Projects) Scheme, C.O. Mumbai | 28.02.2017 |
| 2. | Shri.Gajbhiye Yashwant Ganpat | CE (Trans.) | EHV PC O&M Zone, Karad | 28.02.2017 |
| 3. | Shri.Bhosale Chandrakant Rajaram | SE (Trans.) | EHV O&M Circle, Panvel | 28.02.2017 |

## From the Desk of ED (HR)

Professional Excellence म्हणजे आपण ज्या विभागामध्ये काम करतो त्या विभागाच्या कार्यकुशलतेच्या परोमोच्च स्थानावर जाणे. त्याकरीता आपण समाधानी न राहता सतत अभ्यास करणे गरजेचे राहते. मला सर्व माहित आहे असे समजून समाधानी न राहता ज्ञानाचा झरा शोधता आला पाहिजे. known is a drop, unknown is an ocean.

त्यासाठी Devotion, Commitments, Work Discipline, Hard Work and Sincerity असणे गरजेचे आहे. आपल्याला मिळालेले ज्ञान कुठे तरी संग्रही करणे व त्याचा वेळेनुसार अभ्यास करणे हेहीगरजेचे राहते.




वाचन, आकलन, मनन व चिंतन हे अभ्यासाचे चार घटक ठरतात. त्याकरीता ह्या प्रत्येक बाबींवर व्यवस्थित सराव करणे गरजेचे आहे. अभ्यास म्हणजे रियाज, तो केला तरच विषयामध्ये परिपूर्णता येते. विषयामध्ये Reach आणि Deep जाणाऱ्या व्यक्तीस सिध्दता मिळते व तो स्वयंपूर्ण होतो. Professional Excellence प्राप्त केलेला माणूस त्याच्या विषयावर तासनंतास प्रवचन देऊ शकतो. त्यांची त्या विषयामध्ये विद्वत्ता प्राप्त झालेली असते. It is a continuous process कारण असे म्हटले आहे Professional Excellence is a journey and not a destination. कोणीही म्हणू शकत नाही की मी परिपूर्ण आहे.

आजच्या प्राप्त परिस्थिती मध्ये कोणतीही Stage/Phase मध्ये Professional Excellence गाठण्याचे आपण प्रयास करु शकतो. यामध्ये एक वेगळा प्रकारचा आनंद व समाधान आहे. जग साक्ष आहे की, असेच लोक पुढे यश प्राप्त करुन जगाला घडवण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

काही वेळा आपण चुकीच्या पध्दतीने मार्ग क्रमण करण्याची शक्यता असते. आधी मला काय मिळेल व त्यानंतर तो विषय अभ्यासाने व त्याचा परिणाम म्हणून आपल्याला एक तात्विक यश प्राप्त होते पण एक प्रेरणास्थान होण्यापासून आपण वंचित राहतो. दुसऱ्यास हरवण्यापेक्षा त्यास जिंकण्यास जो मनोकामना ठेवतो तोच खरा युगपुरुष व सत्याचा मार्ग व तेच खरे Professional Excellence.

शुभेच्छां सह !

**सुरज वाघमारे**
कार्यकारी संचालक (मासं)


**संपादक : कु. रेणुका नाटके, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण) (प्रभारी)**
**E-mail : prohr@mahatransco.in**
**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं. सी. - १९, ई. ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO **For Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts :** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra Kurla Complex, Mumbai - 400 051.


The Company accepts no responsibility for the matter published in the journal.